Exh.No. 25

# नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डि)

यांचे कोर्टात

रे.मु.नं. वादी

६५४/२०२५ कु.स्नेहल जयराम अनारसे

प्रतिवादी

बबन गणपत अनारसे

Order
Read & Recorded.

PRANITA RITESH SUGAONKAR Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2026.01.28 17:58:48 +0530

Jt.CJJD

**याकामी प्रतिवादी नं.१ ते ३ व ५ कडून दाव्याची व मनाई हुकूमाची कैफियत असे ती खालील प्रमाणे.**

१) वादीचा दावा व मनाई अर्ज यातील विधाने खोटी व लबाडीची असून प्रतिवादींना मान्य नाही, कबुल नाही, त्यातील संपूर्ण मजकूर प्रतिवादी नाकारीत आहे.

२) वादीचा दावा कायदयाने टेनेबल व मेटेनेंबल नाही. सबब वादीचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यात यावा.

३) वादीने दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या चतुर्सिमा दिलेले नाहीत मिळकत वर्णन अपुर्ण दिलेले आहे त्यामुळे वादीचे दाव्यास सी पी सी ऑर्डर ७ रुल ३ चा बाध येत असल्याने वादीचा दावा सकृत दर्शनी रद्द होण्यास पात्र आहे.

४) वादीने दाव्या मध्ये सर्व मिळकती घातलेले नाही त्यामुळे वादीचे दाव्यास पार्शल पार्टीशन या तत्वाचा बाध येत असल्याने वादीचा दावा सकृत दर्शनी रद्द होण्यास पात्र आहे.

५) वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नव्हते व नाही. अशा प्रकारे वादीचा दावा व मनाई अर्ज विनाकारण असल्याने रदद होण्यास पात्र आहे.

६) सदर दाव्यात वादीने अनेक गोष्टी लपवून ठेवल्या असून मे.कोर्टा पासून लपवून ठेवलेल्या आहे. त्यामुळे सदरचा दावा व मनाई अर्ज रदद होण्यास पात्र आहे.

७) वादीचे दाव्यास सी पी सी ऑर्डर ७ रुल ११ चा बाधा येत असून त्यामुळे कायदया प्रमाणे वादीचा दावा चालु शकत नाही तो रद्द होण्यास पात्र आहे.

८) वादीने दावा दाखल करतांना कोणतीही माहिती घेतलेली नाही. तसेच सदर दावा दाखल करण्यास योग्य ते कारण घडलेले नाही. तसेच सदर दावा हा वाटप व निरंतर ताकीद मनाई हुकूमाचा असल्याने वादीने कुठल्याही प्रकारची किंमत न काढता खोटया स्वरुपाचा दावा दाखल केलेला आहे. व त्यावर योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. त्यामुळे सदरचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यात यावा.

९) वादीचे दावा कलम ३ मधील मजकूर की "दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित व एकत्र हिंदु कुटुंबाच्या खरेदी मालकीच्या आहेत.वादीचे वडील जयराम बबन अनारसे हे दि.१३/१०/२०२० रोजी मयत झालेले असुन वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये आपसात सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही.वादीचे वडील जयराम हे हयात असतांना कुटुंब व्यवस्था म्हणुन घरातील सर्व प्रमुख सदस्यांच्या नांवे जमीनी करण्यात आल्या होत्या.परंतु त्यांचया मध्ये आपसात कायदेशीर सरस निरस मानाने झालेले नव्हते व नाही.त्यातच वादीच्या वडीलांचा कोरोना काळात कोरोना आजाराने मृत्यु झाल्याने वादी व प्रतिवादी नं ४,६ व ७ हे अनाथ व निराधार झालेले होते व आहे.वादीच्या वडीलांचा मृत्यु झाल्यामुळे प्रतिवादी नं १ते३ हे एकमिलाफी झाले असुन ते वादी व तिच्या

कुटुंबाला त्यांच्या कायदेशीर हिश्या प्रमाणे व हक्का पासुन वंचित टेऊ पहात आहेत व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालु आहेत. " हा मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. दाव्यात दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली मिळकत ही वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटूंबाची असून दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली मिळकत ही प्रतिवादी नं.२ हिची स्वतंत्र स्वकष्टार्जित मिळकत आहे. तिच्याशी वादी व इतर प्रतिवादी यांचा कुटल्याही प्रकारचा संबंध नव्हता व नाहीत.

१०) वादीचे दावा कलम ४ मधील मजकूर की, "वादीचे वडील मयत झाल्यामुळे वादीचे कुटुंब हे प्रतिवादी नं १ ते ३ यांना धरुन प्रतिवादी नं १ च्या नांवावर असलेल्या मिळकती मध्ये वस्ती करुन रहात आहेत.वादीचे वडील मयत झाल्यानंतर वादीची आजी प्रतिवादी नं २ ही वादीच्या कुटुंबा सोबत व प्रतिवादी नं १ हे प्रतिवादी नं ३ च्या कुटुंबा सोबत रहात होते.परंतु दोन ते अडीच वर्षाने प्रतिवादी नं १ व ३ यांनी प्रतिवादी नं २ हिस त्यांच्या कुटुंबा मध्ये घेवुन गेले.प्रतिवादी यांचा मुळ उद्देश हा वादी व तिच्या कुटुंबाचा संपूर्ण दावा मिळकती मध्ये असलेला हिस्सा बुडवणे हा असल्याने प्रतिवादी नं १ते३ हे एकमिलाफी झाले व प्रतिवादी नं १ते३ यांच्या नांवावर मिळकती असल्याचा गैरफायदा घेत वादीच्या कुटुंबाला कोणत्याही पुरुष सदस्य यांचा आधार नसल्याने प्रतिवादी नं १ते३ हे प्रतिवादी नं १ व २ यांच्या नांवावरील मिळकती परस्पर विक्री करण्याच्या तयारीत आहेत व त्या दृष्टीने त्यांनी गांवात विक्री बाबत सौदे बाजी चालु असल्याचे खात्री लायक बातमी वादी हिस मिळालेली आहे.त्यामुळे वादी हिने दि.२५/७/२०२५ रोजी प्रतिवादी यांना वादीचा दावा मिळकतीत

असलेला अविभक्त वडीलोपार्जित हिस्सा वाटुन,विभागुन मागितला असता प्रतिवादी नं १ते३ यांनी वादी हिस सदर दावा मिळकती मधील असलेला वादीचा असलेला अविभक्त हिस्सा वाटुन विभागुन देण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला.व " आम्ही दावा मिळकत विकुन टाकणार *आहोत,तुम्हांला काय करावयाचे ते करा " असे म्हणुन दावा मिळकतीची* विक्री करण्या बाबतची धमकी दिली.व दावा मिळकत वाटुन विभागुन देण्यास नकार दिला.म्हणुन वादीस प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्या कामी दाखल केलेला आहे. " हा मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. दावा मिळकत विक्री करण्याचा प्रतिवादीस काहीएक कारण नाही तसेच वादीचे वडिल जयराम हे हयात असतांनाच प्रतिवादी नं.१,३ व वादीचे वडिल जयराम हे विभक्त राहत होते. प्रत्येकाचे जमिनीचे वेगवेगळया होत्या. त्यामुळे वादीने हिस्सा वाटप करुन मागण्याचे काहीएक कारण नाही.

११) वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही सबब वादीने खोटे कारण नमुद करुन सदरचा खोटा दावा या प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे.

१२) वादीचे दावा कलम १० मधील विनंत्या हया बेकायदेशीर असून सदरच्या विनंत्या हया मान्य करण्यात येवू नये सबब वादीचा दावा याही कारणस्तव रद्द करण्यात यावा.

१३) वादीने दाव्या सोबत जो तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दिलेला आहे त्या मधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असून तो या प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही.

१४) **खरीवस्तुस्थिती अशी आहे की,** सदर दाव्यातील प्रतिवादी बबन गणपत अनारसे हे मुळत: सोनई ता.नेवासा येथील रहिवाशी होते. बबन गणपत अनासरे यांना आणखीन विठ्ठल व पांडूरंग असे दोन भाऊ होते. अनासरे कुटूंबियांना सोनई येथे व मौजे भानसहिवरा ता.नेवासा शेत जमिन मिळकती होत्या. त्यांनी तिघा भावाचे वाटप झाल्यानंतर पांडूरंग व विठ्ठल यांना सोनई येथील मिळकत देण्यात आली तर प्रतिवादी नं.१ बबन गणपत अनारसे यांना मौजे भानसहिवरा ता.नेवासा येथील गट नंबर २६ पैकी मिळकत देण्यात आली. वाटप झाल्यानंतर प्रतिवादी नं.१ व त्याची पत्नी प्रतिवादी नं.२ हे त्याचे मुलाबाळासह मौजे भानसहिवरा ता.नेवासा येथे रहावयास आले. प्रतिवादी नं.१ व २ हे भानसहिवरा ता.नेवासा येथे आल्यानंतर मौजे भानसहिवरा ता.नेवासा येथील गट नंबर ४८/१/१ क्षेत्र १ हे ३७ आर ही ओंकार धोंडीबा अन्नदाते, सरस्वती धोंडीराम अन्नदाते याचे मालकीची मिळकत विक्रीस निघाल्यानंतर प्रतिवादी नं.१ व २ यांनी प्रतिवादी नं.२ चे स्त्रीधन म्हणून असलेले दागदागिणेची विक्री करुन तसेच प्रतिवादी नं.२ चे वडिलांकडून काही पैसे घेवुन सदरची मिळकत दिनांक १४/०७/१९८१ रोजी रक्कम रुपये १७०००/- रजिस्टर खरेदीखताने विकत घेतली. सदर मिळकत ही पुर्णपणे प्रतिवादी नं.२ हिची स्वतंत्र मिळकत आहे. तिच्याशी वादी व इतर प्रतिवादी यांचा काहीएक हक्क संबंध नव्हता व नाही.

१५) सदर प्रतिवादी नं.१ व २ यांना प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व वादीचे वडिल जयराम हे दोन मुले व प्रतिवादी नं.५ आशाबाई ही मुलगी झालेली होती. सदर प्रतिवादी नं.५ हिचे लग्न प्रतिवादी नं.१ याने करुन दिलेले असून

सदर प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व वादीचे वडिल जयराम या दोघांचे लग्न झाल्यानंतर त्यांच्या उभयतांच्या पत्नीचे घरात पटत नव्हते घरा मध्ये कायम वाद होत होते. त्या वादा मुळे शेतीकडे दुर्लक्ष होत होते. व प्रपंचाची धुळधाण चालली होती. म्हणून प्रतिवादी नं.१ याने व त्याचे नातेवाईकांनी आपसात बसुन सदर प्रतिवादी नं.१ व त्याची दोन मुले म्हणजेच प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व मयत जयराम यांच्या मध्ये मिळकती वाटून दिल्या त्या प्रमाणे प्रतिवादी नं.१ याचे नावावर गट नंबर २६/२/क क्षेत्र १ हे ७६ आर ही मिळकत ठेवण्यात आली. प्रतिवादी नं.३ बाबासाहेब याचे नावावर गट नंबर २६/२/ब क्षेत्र १ हे ७५ आर ही मिळकत ठेवण्यात आली तर मयत वादीचे वडिल व प्रतिवादी नं.४ चे पती व प्रतिवादी नं.६ व ७ चे वडिल मयत जयराम यांचे नावावर गट नंबर २६/२/अ क्षेत्र १ हे ७५ आर इतकी जमिन ठेवण्यात आली अशी सारखी जमिन सर्वांचे नावावर ठेवण्यात येवुन त्यावेळेसच प्रतिवादी नं.२ चे नावावर खरेदी घेतलेली मिळकत ही तिची स्वतंत्र मिळकत आहे तिचे वाटप करावयाचे नाही असे त्यांचे मध्ये ठरलेले होते. तसेच प्रतिवादी नं.१ याचे नावावर असलेली मिळकत त्याचे नंतर त्याची मुलगी प्रतिवादी नं.५ हिस दयावयाची असे त्यांचे आपसात ठरले होते. त्या प्रमाणे जो तो ज्याच्या त्याच्या जमिनी वहित करु लागला सदर प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व वादीचे मयत वडिल जयराम यांनी ज्याचे त्याचे स्वतंत्र बंगले बांधले व त्या बंगल्या मध्ये ते स्वतंत्र राहू लागले. ज्याचे त्याचे कुपने ही स्वतंत्र होते. एकत्र कुटूंब कुठेही अस्तीत्वात नव्हते प्रतिवादी नं.१ व २ हे उभयतां पती पत्नी त्याचे जुन्या घरा मध्ये राहत

असत त्याचे कुपन त्याच्या मुलां पासुन वेगळे होते. एकमेंकाचा एकमेकाशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहिलेला नव्हता व नाही.

१६) सदर प्रतिवादी नं.१ चा मुलगा व वादीचे वडिल जयराम हा कोव्हीड मध्ये मयत झाला तो मयत झाला त्यावेळेस त्याची मुलगी प्रतिवादी नं.६ हिचे लग्न झालेले होते त्याचे मृत्युनंतर प्रतिवादी नं.१ यानेच प्रतिवादी नं.७ हिचा विवाह करुन दिला दोन्ही मुली या एकाच घरात दिलेले आहेत. सदर प्रतिवादी नं.७ हिचे विवाहचा खर्च प्रतिवादी नं.१ व २ यांनी केलेला आहे. प्रतिवादी नं.१ व २ यांनी आजी आजोबा म्हणून केलेला आहे व त्याचे कर्तव्य पार पाडलेले आहेत. सदर वादीचे वडिल जयराम याचे मृत्युनंतर वादीची आई प्रतिवादी नं.४ व वादी हे जयराम याने बांधलेले बंगल्या मध्ये राहत होते. सदर प्रतिवादी नं.१ हा त्याचेकडे लक्ष ठेवत असे व मागे पुढे मदत करीत असे. प्रतिवादी नं.७ चा विवाह झाल्यानंतर काही दिवसांनी प्रतिवादी नं.६ व ७ यांच्या घरच्यांच्या मना मध्ये अभिलाष बुध्दी निर्माण झाली व त्यानंतर त्यांनी वादीस पुढे करुन सदरचा खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे. सदर वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब हे अस्तीत्वात नाही ते वादीचे वडिल हयात असतांनाच विभक्त झालेले आहेत. त्यामुळे वाटपाचा दावा चालु शकत नाही. केवळ प्रतिवादी नं.६ व ७ याचे सासरकडील घरच्यांचे सांगण्यावरुन सदरचा खोटा व बनावट दावा वादीने दाखल केलेला आहे. तो रद्द होण्यास पात्र आहे.

१७) सदर प्रतिवादी नं.१ व २ हे वयस्कर झालेले असून प्रतिवादी नं.२ ही नेहमी आजारी असते त्यांचा तरुण मुलगा मयत झालेले आहे. त्यांना आधार न देता प्रतिवादी नं.६ व ७ यांच्या घरच्यांनी वादीस व प्रतिवादी नं.४ यांना

पुढे करुन एकत्र कुटूंब अस्तीत्वात नसतांना प्रतिवादीची मिळकत हडपण्यासाठी प्रतिवादीवर कायदयाचा धाक दाखवुन दडपण आणले म्हणजे प्रतिवादी नं.१ व २ हे मिळकत आपल्याला देतील या दृष्ट उद्देशाने प्रेरीत होवुन सदरचा खोटा व बनावट दावा दाखल करण्यास वादीस भाग पाडलेले आहे तो रद्द करण्यात यावा.

१८) वरील सर्व कारणांचा व परिस्थीतीचा विचार होवून वादींचा दावा खर्चासहीत रद्द करण्यात यावा व प्रतिवादी यांना निष्कारण खर्चात पाडले बद्दल वादी कडून प्रतिवादी यांना प्रत्येकी कॉम्पेसेटरी कॉस्ट रुपये २५०००/- देण्यात येवून वादीचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा.

येणे प्रमाणे प्रतिवादी तर्फे दाव्याची व मनाई हुकूमाची कैफियत असे.

नेवासा

दिनांक २३/१२/२०२५

दा ता 1/1/2026

[illegible] ९/१/२६

प्रतिवादी तर्फे ॲड

प्रतिवादी

याकामी आम्ही प्रतिवादी सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वरील कैफियत कलम १ ते १८ मधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आजरोजी आम्ही आमच्या सहया केले आहेत

नेवासा

दिनांक २३/१२/२०२५

दा ता 1/1/2026

[illegible] ९/१/२६

२

३

५ अ.बी. कुलकर्णी.

प्रतिवादी

पक्षकाराने दिलेल्या माहिती वरुन दाखविलेल्या कागदपत्रावरुन सदर कैफियतीचा मसुदा तयार करुन दाखल केलेला आहे.

Contents are Verified

Asstt. Supdt.

1/10/18

Exh.No. 26

# ॲफिडेव्हीट

नेवासा येथील मे.सिव्हील जज्ज साहेब (ज्यु.डि)

यांचे कोर्टात

रे.मु.नं. **वादी**

६५ /२०२५ कु.स्नेहल जयराम अनारसे

**प्रतिवादी**

बबन गणपत अनारसे




**याकामी मी बबन गणपत अनारसे वय ७५,धंदा शेती रा.भानसहिवरा ता.नेवासा जि.अ.नगर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,**

१) वादीचा दावा व मनाई अर्ज यातील विधाने खोटी व लबाडीची असून प्रतिवादींना मान्य नाही, कबुल नाही, त्यातील संपूर्ण मजकूर प्रतिवादी नाकारीत आहे.

२) वादीचा दावा कायदयाने टेनेबल व मेटेनेबल नाही. सबब वादीचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यात यावा.

Order Filed.

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2026.01.28 17:58:59 +0530
PRANITA RITESH SUGAONKAR

Jt.CJJD

३) वादीने दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या चतुर्सिमा दिलेले नाहीत मिळकत वर्णन अपुर्ण दिलेले आहे त्यामुळे वादीचे दाव्यास सी पी सी ऑर्डर ७ रुल ३ चा बाध येत असल्याने वादीचा दावा सकृत दर्शनी रद्द होण्यास पात्र आहे.

४) वादीने दाव्या मध्ये सर्व मिळकती घातलेले नाही त्यामुळे वादीचे दाव्यास पार्शल पार्टीशन या तत्वाचा बाध येत असल्याने वादीचा दावा सकृत दर्शनी रद्द होण्यास पात्र आहे.

Assistant Superintendent
Criminal Court Newasa

५) वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नव्हते व नाही. अशा प्रकारे वादीचा दावा व मनाई अर्ज विनाकारण असल्याने रदद होण्यास पात्र आहे.

६) सदर दाव्यात वादीने अनेक गोष्टी लपवून ठेवल्या असून मे.कोर्टा पासून लपवून ठेवलेल्या आहे. त्यामुळे सदरचा दावा व मनाई अर्ज रदद होण्यास पात्र आहे.

७) वादीचे दाव्यास सी पी सी ऑर्डर ७ रुल ११ चा बाधा येत असून त्यामुळे कायदया प्रमाणे वादीचा दावा चालु शकत नाही तो रद्द होण्यास पात्र आहे.

८) वादीने दावा दाखल करतांना कोणतीही माहिती घेतलेली नाही. तसेच सदर दावा दाखल करण्यास योग्य ते कारण घडलेले नाही. तसेच सदर दावा हा वाटप व निरंतर ताकीद मनाई हुकूमाचा असल्याने वादीने कुठल्याही प्रकारची किंमत न काढता खोटया स्वरुपाचा दावा दाखल केलेला आहे. व त्यावर योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. त्यामुळे सदरचा दावा व मनाई अर्ज रद्द करण्यात यावा.

९) वादीचे दावा कलम ३ मधील मजकूर की "दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित व एकत्र हिंदु कुटुंबाच्या खरेदी मालकीच्या आहेत.वादीचे वडील जयराम बबन अनारसे हे दि.१३/१०/२०२० रोजी मयत झालेले असुन वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये आपसात सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही.वादीचे वडील जयराम हे हयात असतांना कुटुंब व्यवस्था म्हणुन घरातील सर्व प्रमुख सदस्यांच्या नांवे जमीनी करण्यात आल्या होत्या.परंतु त्यांचया मध्ये आपसात कायदेशीर सरस निरस मानाने झालेले नव्हते व नाही.त्यातच वादीच्या वडीलांचा कोरोना काळात कोरोना आजाराने मृत्यु झाल्याने वादी व प्रतिवादी नं ४,६

व ७ हे अनाथ व निराधार झालेले होते व आहे.वादीच्या वडीलांचा मृत्यु झाल्यामुळे प्रतिवादी नं १ते३ हे एकमिलाफी झाले असुन ते वादी व तिच्या कुटुंबाला त्यांच्या कायदेशीर हिश्या प्रमाणे व हक्का पासुन वंचित टेऊ पहात आहेत व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालु आहेत. " हा मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. दाव्यात दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली मिळकत ही वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटूंबाची असून दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली मिळकत ही प्रतिवादी नं.२ हिची स्वतंत्र स्वकष्टार्जित मिळकत आहे. तिच्याशी वादी व इतर प्रतिवादी यांचा कुठल्याही प्रकारचा संबंध नव्हता व नाहीत.

Superintendent
Court Newasa

१०) वादीचे दावा कलम ४ मधील मजकूर की, "वादीचे वडील मयत झाल्यामुळे वादीचे कुटुंब हे प्रतिवादी नं १ ते ३ यांना धरुन प्रतिवादी नं १ च्या नांवावर असलेल्या मिळकती मध्ये वस्ती करुन रहात आहेत.वादीचे वडील मयत झाल्यानंतर वादीची आजी प्रतिवादी नं २ ही वादीच्या कुटुंबा सोबत व प्रतिवादी नं १ हे प्रतिवादी नं ३ च्या कुटुंबा सोबत रहात होते.परंतु दोन ते अडीच वर्षाने प्रतिवादी नं १ व ३ यांनी प्रतिवादी नं २ हिस त्यांच्या कुटुंबा मध्ये घेवुन गेले.प्रतिवादी यांचा मुळ उद्देश हा वादी व तिच्या कुटुंबाचा संपूर्ण दावा मिळकती मध्ये असलेला हिस्सा बुडवणे हा असल्याने प्रतिवादी नं १ते३ हे एकमिलाफी झाले व प्रतिवादी नं १ते३ यांच्या नांवावर मिळकती असल्याचा गैरफायदा घेत वादीच्या कुटुंबाला कोणत्याही पुरुष सदस्य यांचा आधार नसल्याने प्रतिवादी नं १ते३ हे प्रतिवादी नं १ व २ यांच्या नांवावरील मिळकती परस्पर विक्री करण्याच्या तयारीत आहेत व त्या दृष्टीने त्यांनी गांवात विक्री बाबत सौदे बाजी चालु

असल्याचे खात्री लायक बातमी वादी हिस मिळालेली आहे.त्यामुळे वादी हिने दि.२५/७/२०२५ रोजी प्रतिवादी यांना वादीचा दावा मिळकतीत असलेला अविभक्त वडीलोपार्जित हिस्सा वाटुन,विभागुन मागितला असता प्रतिवादी नं १ते३ यांनी वादी हिस सदर दावा मिळकती मधील असलेला वादीचा असलेला अविभक्त हिस्सा वाटुन विभागुन देण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला.व " आम्ही दावा मिळकत विकुन टाकणार आहोत,तुम्हांला काय करावयाचे ते करा " असे म्हणुन दावा मिळकतीची विक्री करण्या बाबतची धमकी दिली.व दावा मिळकत वाटुन विभागुन देण्यास नकार दिला.म्हणुन वादीस प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्या कामी दाखल केलेला आहे. " हा मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. दावा मिळकत विक्री करण्याचा प्रतिवादीस काहीएक कारण नाही तसेच वादीचे वडिल जयराम हे हयात असतांनाच प्रतिवादी नं.१,३ व वादीचे वडिल जयराम हे विभक्त राहत होते. प्रत्येकाचे जमिनीचे वेगवेगळया होत्या. त्यामुळे वादीने हिस्सा वाटप करुन मागण्याचे काहीएक कारण नाही.

११) वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही सबब वादीने खोटे कारण नमुद करुन सदरचा खोटा दावा या प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे.

१२) वादीचे दावा कलम १० मधील विनंत्या हया बेकायदेशीर असून सदरच्या विनंत्या हया मान्य करण्यात येवू नये सबब वादीचा दावा याही कारणस्तव रद्द करण्यात यावा.

१३) वादीने दाव्या सोबत जो तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दिलेला आहे त्या मधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असून तो या प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही.

१४) **खरीवस्तुस्थिती अशी आहे की,** सदर दाव्यातील प्रतिवादी बबन गणपत अनारसे हे मुळत: सोनई ता.नेवासा येथील रहिवाशी होते. बबन गणपत अनारसे यांना आणखीन विठ्ठल व पांडूरंग असे दोन भाऊ होते. अनासरे कुटूंबियांना सोनई येथे व मौजे भानसहिवरा ता.नेवासा शेत जमिन मिळकती होत्या. त्यांनी तिघा भावाचे वाटप झाल्यानंतर पांडूरंग व विठ्ठल यांना सोनई येथील मिळकत देण्यात आली तर प्रतिवादी नं.१ बबन गणपत अनारसे यांना मौजे भानसहिवरा ता.नेवासा येथील गट नंबर २६ पैकी मिळकत देण्यात आली. वाटप झाल्यानंतर प्रतिवादी नं.१ व त्याची पत्नी प्रतिवादी नं.२ हे त्याचे मुलाबाळासह मौजे भानसहिवरा ता.नेवासा येथे रहावयास आले. प्रतिवादी नं.१ व २ हे भानसहिवरा ता.नेवासा येथे आल्यानंतर मौजे भानसहिवरा ता.नेवासा येथील गट नंबर ४८/१/१ क्षेत्र १ हे ३७ आर ही ओंकार धोंडीबा अन्नदाते, सरस्वती धोंडीराम अन्नदाते याचे मालकीची मिळकत विक्रीस निघाल्यानंतर प्रतिवादी नं.१ व २ यांनी प्रतिवादी नं.२ चे स्त्रीधन म्हणून असलेले दागदागिणेची विक्री करुन तसेच प्रतिवादी नं.२ चे वडिलांकडून काही पैसे घेवुन सदरची मिळकत दिनांक १४/०७/१९८१ रोजी रक्कम रुपये १७०००/- रजिस्टर खरेदीखताने विकत घेतली. सदर मिळकत ही पुर्णपणे प्रतिवादी नं.२ हिची स्वतंत्र मिळकत आहे. तिच्याशी वादी व इतर प्रतिवादी यांचा काहीएक हक्क संबंध नव्हता व नाही.

१५) सदर प्रतिवादी नं.१ व २ यांना प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व वादीचे वडिल जयराम हे दोन मुले व प्रतिवादी नं.५ आशाबाई ही मुलगी झालेली होती. सदर प्रतिवादी नं.५ हिचे लग्न प्रतिवादी नं.१ याने करुन दिलेले असून सदर प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व वादीचे वडिल जयराम या दोघांचे लग्न झाल्यानंतर त्यांच्या उभयतांच्या पत्नीचे घरात पटत नव्हते घरा मध्ये कायम वाद होत होते. त्या वादा मुळे शेतीकडे दुर्लक्ष होत होते. व प्रपंचाची धुळधाण चालली होती. म्हणून प्रतिवादी नं.१ याने व त्याचे नातेवाईकांनी आपसात बसुन सदर प्रतिवादी नं.१ व त्याची दोन मुले म्हणजेच प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व मयत जयराम यांच्या मध्ये मिळकती वाटून दिल्या त्या प्रमाणे प्रतिवादी नं.१ याचे नावावर गट नंबर २६/२/क क्षेत्र १ हे ७६ आर ही मिळकत ठेवण्यात आली. प्रतिवादी नं.३ बाबासाहेब याचे नावावर गट नंबर २६/२/ब क्षेत्र १ हे ७५ आर ही मिळकत ठेवण्यात आली तर मयत वादीचे वडिल व प्रतिवादी नं.४ चे पती व प्रतिवादी नं.६ व ७ चे वडिल मयत जयराम यांचे नावावर गट नंबर २६/२/अ क्षेत्र १ हे ७५ आर इतकी जमिन ठेवण्यात आली अशी सारखी जमिन सर्वांचे नावावर ठेवण्यात येवुन त्यावेळेसच प्रतिवादी नं.२ चे नावावर खरेदी घेतलेली मिळकत ही तिची स्वतंत्र मिळकत आहे तिचे वाटप करावयाचे नाही असे त्यांचे मध्ये ठरलेले होते. तसेच प्रतिवादी नं.१ याचे नावावर असलेली मिळकत त्याचे नंतर त्याची मुलगी प्रतिवादी नं.५ हिस दयावयाची असे त्यांचे आपसात ठरले होते. त्या प्रमाणे जो तो ज्याच्या त्याच्या जमिनी वहित करु लागला सदर प्रतिवादी नं.३ बाबासाहेब व वादीचे मयत वडिल जयराम यांनी ज्याचे त्याचे स्वतंत्र बंगले बांधले व त्या बंगल्या मध्ये ते स्वतंत्र राहू लागले.

Assistant ...

ज्याचे त्याचे कुपने ही स्वतंत्र होते. एकत्र कुटूंब कुठेही अस्तीत्वात नव्हते प्रतिवादी नं.१ व २ हे उभयतां पती पत्नी त्याचे जुन्या घरा मध्ये राहत असत त्याचे कुपन त्याच्या मुलां पासुन वेगळे होते. एकमेंकाचा एकमेकाशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहिलेला नव्हता व नाही.

१६) सदर प्रतिवादी नं.१ चा मुलगा व वादीचे वडिल जयराम हा कोव्हीड मध्ये मयत झाला तो मयत झाला त्यावेळेस त्याची मुलगी प्रतिवादी नं.६ हिचे लग्न झालेले होते त्याचे मृत्युनंतर प्रतिवादी नं.१ यानेच प्रतिवादी नं.७ हिचा विवाह करुन दिला दोन्ही मुली या एकाच घरात दिलेले आहेत. सदर प्रतिवादी नं.७ हिचे विवाहचा खर्च प्रतिवादी नं.१ व २ यांनी केलेला आहे. प्रतिवादी नं.१ व २ यांनी आजी आजोबा म्हणून केलेला आहे व त्याचे कर्तव्य पार पाडलेले आहेत. सदर वादीचे वडिल जयराम याचे मृत्युनंतर वादीची आई प्रतिवादी नं.४ व वादी हे जयराम याने बांधलेले बंगल्या मध्ये राहत होते. सदर प्रतिवादी नं.१ हा त्याचेकडे लक्ष ठेवत असे व मागे पुढे मदत करीत असे. प्रतिवादी नं.७ चा विवाह झाल्यानंतर काही दिवसांनी प्रतिवादी नं.६ व ७ यांच्या घरच्यांच्या मना मध्ये अभिलाष बुध्दी निर्माण झाली व त्यानंतर त्यांनी वादीस पुढे करुन सदरचा खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे. सदर वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब हे अस्तीत्वात नाही ते वादीचे वडिल हयात असतांनाच विभक्त झालेले आहेत. त्यामुळे वाटपाचा दावा चालु शकत नाही. केवळ प्रतिवादी नं.६ व ७ याचे सासरकडील घरच्यांचे सांगण्यावरुन सदरचा खोटा व बनावट दावा वादीने दाखल केलेला आहे. तो रद्द होण्यास पात्र आहे.

Superintendent
Court Newasa

१७) सदर प्रतिवादी नं.१ व २ हे वयस्कर झालेले असून प्रतिवादी नं.२ ही नेहमी आजारी असते त्यांचा तरुण मुलगा मयत झालेले आहे. त्यांना आधार न देता प्रतिवादी नं.६ व ७ यांच्या घरच्यांनी वादीस व प्रतिवादी नं.४ यांना पुढे करुन एकत्र कुटूंब अस्तीत्वात नसतांना प्रतिवादीची मिळकत हडपण्यासाठी प्रतिवादीवर कायदयाचा धाक दाखवुन दडपण आणले म्हणजे प्रतिवादी नं.१ व २ हे मिळकत आपल्याला देतील या दृष्ट उद्देशाने प्रेरीत होवुन सदरचा खोटा व बनावट दावा दाखल करण्यास वादीस भाग पाडलेले आहे तो रद्द करण्यात यावा.

१८) वरील सर्व कारणांचा व परिस्थीतीचा विचार होवून वादींचा दावा खर्चासहीत रद्द करण्यात यावा व प्रतिवादी यांना निष्कारण खर्चात पाडले बद्दल वादी कडून प्रतिवादी यांना प्रत्येकी कॉम्पेसेटरी कॉस्ट रुपये २५०००/- देण्यात येवून वादीचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा.

हे ॲफिडेव्हीट करुन दिले असे

नेवासा

दिनांक २३/१२/२०२५

बबन गणपत अनारसे

ॲफि.करणार

ओळख

(ॲड. एस. एस. शिंदे)

याकामी मी बबन गणपत अनारसे वय ७५,धंदा शेती रा.भानसहिवरा ता.नेवासा जि.अ.नगर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,वरील

ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आजरोजी मी माझी सही केली आहे.

नेवासा

बबन गणपत अमरस्य

दिनांक २३/१२/२०२५

ॲफि.करणार

Solemnly affirmed before me

by Babun Ganput Amarase Aae 75 old Day

who is identified before me

by Adv. S. D. Shirsath; R/o Bhanadhiwdara

whom I personally know

Asstt Superintendent